माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००४४९

**अपिलार्थी श्री. मोहमद युसुफ शहादत अली शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक**
माध्यमिक विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे कार्यालय,
के.जी. मित्तल आयुर्वेद रूग्णालय व कॉलेज, ८ वा मजला, नेताजी सुभाष मार्ग,
मरीन ड्राईव्ह, मुंबई- ४०० ००४

**जन माहिती अधिकारी**
शिक्षण निरिक्षक कार्यालय, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, ई-विटा इंम्प्रेस इमारत
पहिला मजला, निर्लेप हाऊसच्या बाजूला, ग. द. आंबेकर मार्ग
परेल व्हिलेज, परेल, मुंबई- ४०० ०१२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक**
शिक्षण निरिक्षक कार्यालय, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, ई-विटा इंम्प्रेस इमारत,पहिला मजला,
निर्लेप हाऊसच्या बाजूला, ग. द. आंबेकर मार्ग, परेल व्हिलेज, परेल, मुंबई- ४०० ०१२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
माध्यमिक विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे कार्यालय, के.जी. मित्तल आयुर्वेद रूग्णालय व कॉलेज,
८ वा मजला, नेताजी सुभाष मार्ग, मरीन ड्राईव्ह, मुंबई- ४०० ००४

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०६.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (सुनावणी नोटीस पोस्टाने परत)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०८.२०२३ | २२.०९.२०२३ | १६.१०.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २४.०१.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २२.०९.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २२.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"नवी मुंबई शहरात सुरु असलेल्या मान्यता प्राप्त धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक शाळा यांनी चालू वर्ष मध्ये शासन निर्णय नुसार दाखल केलेले विवरण पत्र याची माहिती शाळा निहाय पूर्ण पत्ता सह मिळावी."*

जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०९.२०२३ रोजी अपिलार्थींचा माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये शिक्षण निरीक्षक (दक्षिण विभाग), मुंबई या कार्यालयाकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १६.१०.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थींची सुनावणी नोटीस पोस्टाने परत आलेली आहे. आयोगाच्या कार्यालयाने अपिलार्थींशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

अभिलखावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थींनी माहिती अर्जात नवी मुंबई शहरात सुरु असलेल्या अल्पसंख्यांक शाळांविषयी माहिती विचारली होती. तेव्हा जन माहिती अधिकारी यांच्याकडून शिक्षण निरीक्षक (दक्षिण विभाग), मुंबई यांच्याकडे माहिती अर्ज हस्तांतरीत केल्याची कार्यवाही उचित दिसून येत नाही. कारण की, अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती दुसरे जिल्हाशी संबंधीत होती. तसेच, जन माहिती अधिकारी आयोगस स्पष्ट करु शकले नाही की, त्यांनी शिक्षण निरीक्षक (दक्षिण विभाग) यांच्याकडे का माहितीचा अर्ज हस्तांतरीत केला. जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले की, सदर माहिती अर्ज शिक्षण अधिकारी, ठाण यांच्याकडे हस्तांतरीत केला पाहिजे होता.

अभिलखावरुन असे स्पष्ट होते की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांनी दि. १७.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, त्यांचा माहिती अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज त्यांचे कार्यालयाशी संबंधीत नसल्याने उपलब्ध करुन देता येत नाही. यावरुन स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी यांनी केलेली चुकीचे कार्यवाहीमुळे अपिलार्थींना माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींचा माहिती अर्ज उचित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या ५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने कळवावे.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २२.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून योग्य माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

25-6-2025

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

# अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००४४९

**अपिलार्थी श्री. मोहमद युसुफ शहादत अली शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक**
माध्यमिक विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे कार्यालय,
के.जी. मित्तल आयुर्वेद रूग्णालय व कॉलेज, ८ वा मजला, नेताजी सुभाष मार्ग,
मरीन ड्राईव्ह, मुंबई- ४०० ००४

**जन माहिती अधिकारी**
शिक्षण निरिक्षक कार्यालय, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, ई-विटा इंम्प्रेस इमारत
पहिला मजला, निर्लेप हाऊसच्या बाजूला, ग. द. आंबेकर मार्ग
परेल व्हिलेज, परेल, मुंबई- ४०० ०१२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक**
शिक्षण निरिक्षक कार्यालय, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, ई-विटा इंम्प्रेस इमारत,पहिला मजला,
निर्लेप हाऊसच्या बाजूला, ग. द. आंबेकर मार्ग, परेल व्हिलेज, परेल, मुंबई- ४०० ०१२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
माध्यमिक विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे कार्यालय, के.जी. मित्तल आयुर्वेद रूग्णालय व कॉलेज,
८ वा मजला, नेताजी सुभाष मार्ग, मरीन ड्राईव्ह, मुंबई- ४०० ००४

## (In continuation of order dtd २५.०६.२०२५)

उक्त प्रकरणी आयोगाने दि. २५.०६.२०२५ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले होते:-

१) *"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींचा माहिती अर्ज उचित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या ५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने कळवावे.*

२) *जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २२.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून योग्य माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.*

३) *अपील निकाली काढण्यात येत आहे."*

सदर प्रकरणी आयोगाचे आदेश दि. २५.०६.२०२६ रोजीच्या अनुषंगाने श्रीम. आशा भगत, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, चर्नी रोड, मुंबई यांनी दि. ११.०७.२०२५ रोजी खालीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे:-

*"मी आशा गणेश भगत आपणास विनंती पूर्वक सादर करते की. आपले सदर आदेश मला दि.०९.०७.२०२५ रोजी प्राप्त झाले आहेत. अपिलार्थी श्री. मोहम्मद युसुफ शहादत अली शेख यांचा माहिती अधिकार अर्ज उचित प्राधिकरणाकडे (शिक्षणाधिकारी, माध्यमिक, ठाणे यांचेकडे) दि. ११.०७.२०२५ रोजी हस्तांतरित करण्यात आला आहे.*

..२/-

*माझ्याकडून अपिलार्थी यांना नजरचुकीमुळे योग्य माहिती पुरवली गेली नाही, याबददल क्षमस्व. कामाचा ताण व एकाच व्यकतिचे एकाच विषयाचे अनेक माहिती अधिकार प्राप्त झाल्यामुळे कार्यालयीन काम करत असतानां अर्जदाराने मागितलेली माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देण्याच्या गडबडीत माझ्याकडून योग्य माहिती पुरवली गेली नाही. यामागे नक्कीच माझा काहीही वाईट हेतू नव्हता, नजर चुकीमुळे असे घडले. तरी मा. आयुक्त यांना विनंती करते की कृपया माझा सदर खुलासा मान्य करावा. भविष्यात मी सतर्क राहीन व अशी चूक माझ्याकडून घडणार नाही याची जाणीव पूर्वक दखल घेईल. कृपया माझ्यावर शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये ही नम्र विनंती."*

श्रीम. आशा भगत, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, चर्नी रोड, मुंबई यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. सबब आदेश पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन दि. २५.०६.२०२५ रोजीच्या आयोगाच्या आदेशानुसार प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे. सदर अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

29-5-2026

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२६**

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**